क्र. १३९ दुसरे वर्ष

# रविवारची उपासना

९ एप्रिल २०२३

## पुनरूत्थानपूर्व जागरणविधी पुनरुत्थानाचा रविवार

### प्रस्तावना

दिवस व रात्र यांचं जसं नातं आहे तसं गुडफ्रायडे आणि ईस्टर ह्यांचं नातं आहे. रात्रीच्या गडद अंधारात उद्याचा उष:काल असतो, तसेच गुडफ्रायडेच्या अंधारात ईस्टरची मंगल पहाट असते. पण ती मंगल पहाट पाहण्यासाठी गुडफ्रायडेची आवश्यकता असते. दु:ख आणि वेदना ह्या नव्या जीवनाच्या वेणा असतात असे म्हटले आहे. वधस्तंभावर खिळलेला ख्रिस्त अनेक यातना व दु:ख सहन करत होता. परंतु त्याच्या अंत:करणात प्रचंड आशावाद होता म्हणूनच ख्रिस्ताने आपल्या जीवनाला गव्हाच्या दाण्याची उपमा दिली. गव्हाचा दाणा मातीत गाडल्यानंतर प्रथम तेथे त्याला मरावे लागते, नंतरच त्याला कोंब फुटतो. मरण म्हणजे जीवनाचा शेवट नसून सार्वकालिक जीवनाची सुरूवात आहे. पुनरुत्थानात सार्वकालिन जीवन आहे पण पुनरुत्थानाचा अनुभव घेण्यासाठी थडग्यावरची प्रथम धोंड सरकवायला हवी. आपले हे जीवन पाप, विश्वासघात, असत्य, अशांती, अनैतिकता, हिंसा, अन्याय, भ्रष्टाचार, भोगवाद व गैरसमज अशा थडग्याने भरलेले असते.

आजच्या ह्या ईस्टरच्या उपासनेत सहभागी होत असताना अशा थडग्याने बनलेल्या जीवनावरची धोंड काढून माणसा-माणसातील ख्रिस्ताला मुक्त करून पुनरुत्थित ख्रिस्ताचा अनुभव यावा म्हणून प्रार्थना करू या.

**निवेदक** (पहिल्या वाचनापूर्वी)

आजच्या पहिल्या वाचनात आपणास परमेश्वराने निर्माण केलेल्या जगाची आठवण करून देण्यात येत आहे. परमेश्वराने सहा दिवस काम केले व सातव्या दिवशी विश्रांती घेतली. सातवा दिवस हा शब्बाथ दिवस, आशिर्वादित केलेला दिवस, पवित्र दिवस.

### पहिले वाचन

**उत्पत्ती** १:१-२:२

**स्तोत्रगीत :** (प्र. स्तो. १०३:१-२,५-६, १०.१२,१३-१४,२४.३५)

प्रार्थना :

**निवेदक :** (दुसऱ्या वाचनापूर्वी)

अब्राहाम म्हणजे श्रध्देचा आदिपिता. ह्या श्रध्देची अग्नीपरीक्षा पाहण्यासाठी परमेश्वर अब्राहामास कसोटीस लावून त्याला आशिर्वादित कसा करतो ह्याचे वर्णन उत्पत्ती ह्या पुस्तकातून घेतलेल्या आजच्या दुसऱ्या वाचनात अनुभवू या.

### दुसरे वाचन

**उत्पत्ती** २२:१-१८

**स्तोत्रगीत :** (प्र. स्तो. १५:५-८,९-१०,११)

प्रार्थना :

**निवेदक :** (तिसऱ्या वाचनापूर्वी)

इस्राएली लोक म्हणजे देवाचे निवडलेले लोक म्हणून देवाने त्यांच्यावर अगाध प्रेम केले. या प्रेमाखातर परमेश्वराने फारोच्या गुलामगिरीतून इस्राएली लोकांची सुटका कशी केली हे आपण निर्गम या पुस्तकातून अनुभवू या.

(निर्गम पुस्तकातून घेतलेले तिसरे वाचन कदापी वगळता येत नाही)

### तिसरे वाचन

**निर्गम** १४:१५-१५:१

**स्तोत्रगीत :**

**निर्गम १५:१-२,३-४,५-६,१७-१८**

प्रार्थना :

**निवेदक :** (चौथ्या वाचनापूर्वी)

आपला निर्माणकर्ता आपला परमेश्वर ह्याचे आपणा सर्वांवर असलेले प्रेम ह्या वाचनात ह्या शब्दात व्यक्त केले जाते ''तुझ्यावर मी शाश्वत प्रेमाने दया करीन असे तुझा उद्धारकर्ता परमेश्वर म्हणतो.''

### चौथे वाचन

**यशया** ५४:५-१४

**स्तोत्रगीत (प्र. स्तो.)**

**२९:२.४,५-६,११-१२अ.१३ब**

प्रार्थना :

**निवेदक :** (पाचवे वाचनापूर्वी)

आपला देव परमेश्वर ह्याने आपणाबरोबर करार केलेला आहे व ह्या कराराची आठवण यशयाच्या पुस्तकातून घेतलेल्या ह्या वाचनाद्वारे आपणास करून देण्यात येत आहे.

### पाचवे वाचन

**यशया** ५५:१-११

**स्तोत्रगीत (प्र. स्तो.)**

**यशया १२:२-३, ४बकड, ५-६**

प्रार्थना

**निवेदक :** (सहाव्या वचनापूर्वी)

बारुखच्या पुस्तकातून घेतलेले वाचन आपणास प्रभूच्या प्रकाशमय मार्गाचा स्वीकार करून आपले जीवन हे प्रभूच्या सहवासात राहण्याचे पाचारण करत आहे.

### सहावे वाचन

**बारुख** ३:९-१५:३२-४:४

**स्तोत्रगीत (प्र.स्तो.)** १८:८, ९, १०, ११

प्रार्थना

**निवेदक :** (सातव्या वाचनापूर्वी)

पुनरुत्थान म्हणजे नुतनीकरण, परिवर्तन. अशुध्दता, अपावित्र्यता यातून आपले नुतनीकरण करण्यास देव आपणास नवीन आत्मा व नवीन हृदय देतो. हे यहेज्केलच्या पुस्तकातून अनुभवू या.

### सातवे वाचन

**यहेज्केल** ३६:१६-२८

**स्तोत्रगीत (प्र. स्तो.)**

४१:३-५; ४२:३-४, ४१:२

प्रार्थना

### पुनरुत्थानरात्रीची मिस्साबली

**निवेदक :** (आठव्या वाचनापूर्वी)

"मेलेल्यातून उठलेला ख्रिस्त यापुढे मरण पावणार नाही" अशी आपली दृढ श्रध्दा आहे व आपण ख्रिस्ताबरोबर मरण पावल्यास त्याच्याबरोबर जिवंत राहू हे आपण आता रोमकरांस पत्र ह्या वाचनातून अनुभवू या.

### आठवे वाचन

**रोमकरांस पत्र** ६:३-११

**आलेलुया... आलेलुया**

**निवेदक :** (शुभवर्तमान वाचनापूर्वी)

पुनरुत्थानाच्या घटनेत महत्त्वाची घटना म्हणजे रिकामी थडगे, पुनरुत्थित ख्रिस्ताचा अनुभव सर्वप्रथम मोठ्या पहाटे कबरेजवळ आलेल्या स्त्रियांना आला. त्याचा अनुभव लूककृत शुभवर्तमानातून घेऊ या.

**"मेलेल्यातून उठलेला ख्रिस्त ह्यापुढे मरण पावणार नाही."**

आपण सर्वांनी ख्रिस्त येशूमध्ये बाप्तिस्मा घेतला तेव्हा आपण त्याच्या मरणात बाप्तिस्मा घेतला, ह्याविषयी तुम्ही अजाण आहात काय? तर मग आपण त्या मरणातील बाप्तिस्म्याने त्याच्याबरोबर पुरले गेलो, ह्यासाठी की, ज्याप्रमाणे ख्रिस्त पित्याच्या गौरवी सामर्थ्याने मेलेल्यातून उठविला गेला त्याचप्रमाणे आपणही नवजीवन जगावे.

कारण जर आपण त्याच्या मरणाच्या प्रतिरूपात त्याच्याशी संयुक्त झालो आहोत तर त्याच्या पुनरुत्थानाच्याही प्रतिरूपात त्याच्याशी संयुक्त होऊ. हे आपल्याला ठाऊक आहे की, हे पापाच्या अधीन असलेले शरीर नष्ट होऊन आपण ह्यापुढे पापाचे दास्य करू नये, म्हणून आपल्यातील जुना मनुष्य त्याच्याबरोबर क्रूसावर खिळला गेला. कारण जो कोणी मेला तो पापाच्या दोषापासून मुक्त होऊन नीतिमान ठरला आहे. आपण ख्रिस्ताबरोबर मरण पावलो असल्यास त्याच्याबरोबर जिवंतही राहू अशी आपली श्रध्दा आहे. आपणास ठाऊक आहे की, मेलेल्यातून उठलेला ख्रिस्त ह्यापुढे मरण पावत नाही, त्याच्यावर यापुढे मरणाची सत्ता चालत नाही. कारण तो मरण पावला, तो पापाला एकदाचाच मरण पावला, तो जगतो तो देवासाठीच जगतो. तसे तुम्हीही ख्रिस्त येशूमध्ये स्वत:स पापाला मेलेले खरे, पण देवाप्रित्यर्थ जिवंत झालेले असे माना.

### प्रतिसाद स्तोत्र

**११७:१-२, १६-१७, २२-२३**

प्रतिसाद : **आलेलुया, आलेलुया, आलेलुया! आलेलुया**

१. परमेश्वराचे उपकारस्मरण करा कारण तो
चांगला आहे, त्याची दया सनातन आहे.
आता इस्राएलाने म्हणावे की, "त्याची
दया सनातन आहे." (प्र)

२. परमेश्वराचा उजवा हात उंचावलेला आहे,
परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करतो. मी
मरणार नाही, मी जगेन आणि परमेश्वराच्या
कृत्यांचे वर्णन करीन. (प्र)

३. बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड
कोनशिला झाला आहे. ही परमेश्वराची
करणी आहे. ती आमच्या दृष्टीने अद्‌भुत
आहे. (प्र)

### शुभवर्तमान

**संत लूकच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २४:१-१२**

**– "तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यांमध्ये का करता?"**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी मोठ्या पहाटेस, आपण तयार केलेली सुगंधी द्रव्ये घेऊन त्या कबरेजवळ आल्या, तो कबरेवरून धोंड लोटलेली आहे असे त्यांना आढळले. त्या आत गेल्यावर त्यांना प्रभू येशूचे शरीर सापडले नाही. या प्रकाराने त्या गोंधळून गेल्या असता, पाहा, लखलखीत वस्त्रे परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे राहिले. तेव्हा भयभीत होऊन त्यांनी आपली तोंडे जमिनीकडे केली असता ते त्यांस म्हणाले, "तुम्ही जिवंताचा शोध मेलेल्यांमध्ये का करता? तो तेथे नाही, तर उठला आहे. तो गालीलात होता तेव्हाच त्याने तुम्हांस काय सांगितले ह्याची आठवण करा. ते असे की, मनुष्याच्या पुत्राला पापी जनांच्या हाती धरून देण्यात यावे, त्याला वधस्तंभावर खिळण्यात यावे व तिसऱ्या दिवशी त्याने पुन्हा उठावे, ह्याचे अगत्य आहे." तेव्हा त्यांना त्याच्या बोलण्याची आठवण झाली आणि कबरेपासून परत येऊन त्यांनी अकरा प्रेषितांस व बाकीच्या सर्वांस हे सगळे वर्तमान सांगितले. त्या स्त्रिया म्हणजे मग्दालिया मरिया, योहान्ना व याकोबाची आई मरीया ह्या होत्या. त्यांच्याबरोबर ज्या दुसऱ्या होत्या त्यांनीही हे वर्तमान प्रेषितांना सांगितले. परंतु हे वर्तमान त्यांस वायफळ बडबड वाटली व ते त्यांनी खरे मानले नाही. पेत्र मात्र उठून कबरेकडे धावत गेला. ओणवे होऊन त्याने आत पाहिले तो त्याला केवळ तागाची वस्त्रे दिसली, तेव्हा झालेल्या गोष्टीविषयी आश्चर्य करीत तो घरी गेला.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

### श्रध्दावंतांच्या प्रार्थना

आपला प्रतिसाद असेल – "प्रार्थना करते है, वंदना करते है!" (गायनात)

१. आपल्या कार्याद्वारे पुनरुत्थानाचा अनुभव देणारे पोपमहाशय,

बिशप, धर्मगुरू ह्यांना चांगले आरोग्य व कृपा लाभावी म्हणून आपण प्रभूचरणी प्रार्थना करू या.

२. पुनरुत्थान म्हणजे ख्रिस्ती श्रध्दा. आपल्या जीवनाद्वारे, कार्याद्वारे इतरांना श्रध्देचे अनुभव यावेत म्हणून आपण प्रभूचरणी प्रार्थना करू या.

३. बऱ्याचदा आपण सर्वजण असत्याच्या, अन्यायाच्या व मुखवट्याच्या थडग्याखाली भरडलो जात असतो. अशा थडग्यावरील धोंड बाजूला करण्याचे सामर्थ्य व प्रकाश पुनरुत्थित ख्रिस्ताकडून मिळावा म्हणून आपण प्रभूचरणी प्रार्थना करू या.

४. अंध व्यक्ती, अपंग व्यक्ती, अनाथ बालके यांच्या जीवनात अंध:कार असतो. त्यांचे जीवन प्रकाशमय करण्यासाठी अनेक संस्था नि:स्वार्थीपणे झटत आहेत. या सर्व नि:स्वार्थी लोकांसाठी आपण प्रभूचरणी प्रार्थना करू या.

५. ख्रिस्ताच्या प्रेमाचा प्रकाश सगळीकडे पसरावा. ''या प्रकाशात खरा धर्म म्हणजे माणुसकी हे आम्हांस समजावे, सर्व धर्मयुध्द आणि धार्मिक वाद यांचे रूपांतर जागतिक शांतीत व्हावे म्हणून आपण प्रभूचरणी प्रार्थना करू या.

६. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## चिंतन

इस्टरच्या जागरणविधीमध्ये ख्रिस्तसभा मानवाच्या तारणाचा इतिहास सादर करते. इस्टरच्या सकाळच्या मिस्सेमध्ये मात्र येशूच्या पुनरुत्थानाचे परिणाम वर्णन करते. पहिल्या वाचनात नमूद करण्यात आलेली पापक्षमा (प्रे.कृ.१०:२४, ३७-४३) आणि दुसऱ्या वाचनात नूमद करण्यात आलेले सार्वकालिक जीवन (कलस्सै.३:१-४) या व्यतिरिक्त आजचे शुभवर्तमान (मत्तय २८:१-१०) येशूच्या पुनरुत्थानाचे तीन परिणाम सादर करते:

**अ) येशूचे पुनरुत्थान-स्वर्ग आणि पृथ्वीला जोडणारा दुवा :** संत मार्कच्या शुभवर्तमानात एक तरुण स्त्रियांच्या दृष्टीस पडतो व तो त्यांना प्रभूच्या पुनरुत्थानाची शुभवार्ता देतो. मत्तयमध्ये मात्र एक देवदूत स्वर्गातून उतरतो व येशूच्या थडग्यावरील धोंड सरकवून तिच्यावर बसतो. मत्तयच्या शुभवर्तमानात देवदूतांना जे अनन्यसाधारण महत्त्व देण्यात आलेले आहे (योसेफला स्वप्नात दर्शन देऊन मार्गदर्शन करणे, अरण्यातील मोहानंतर येशूची सेवा करणे, युगाच्या समाप्तीच्यावेळी कापणी करणे, स्वर्गातील पित्यासमोर हजर राहणे) त्याला हे वर्णन धरून आहे.

**ब) येशूचे पुनरुत्थान-नव्या युगाचा प्रारंभ :** मार्कमधील स्त्रिया भीतीने व हर्षातिशयाने धावतपळत शिष्यांकडे येतात आणि त्यांना येशूच्या पुनरुत्थानाची सुवार्ता सांगतात. ख्रिस्तसभेतील एका नव्या युगाच्या प्रारंभाचे ते द्योतक होय.

**क) येशूचे पुनरुत्थान-नव्या जबाबदारीची नवीन जाणीव :** मत्तयमधील शिष्य येशूच्या दु:खसहनप्रसंगी विखुरलेले होते. आता त्यांनी गालीलात एकत्र यावे असा निरोप पुनरुत्थित ख्रिस्त स्त्रियांकरवी त्यांना पाठवतो. ह्या प्रेषितांना गालीलातच प्रभूने पाचारण केले होते. आता तिथूनच त्यांना एका नव्या जबाबदारीची नव्याने जाणीव पुनरुत्थित येशू करून देणार होता याचेच ते सूचक होते.

**आत्मपरीक्षण :** येशूच्या पुनरुत्थानाचा कोणता परिणाम माझ्या जीवनात प्रामुख्याने दिसून येतो?

**पुनरुत्थान रविवार (दिवसाचा मिस्साबली)**

## प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या**

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, तुझा पुत्र ख्रिस्त याला पुन्हा उठवून तू मृत्यूच्या सामर्थ्यावर विजय मिळविलास व सार्वकालिक जीवनाचा दरवाजा आम्हासाठी उघडलास. आजच्या ह्या समर्पणविधीच्या कृपाप्रसादाने आमचा उध्दार कर व आम्हामध्ये निवास करीत असलेल्या पवित्र आत्म्याद्वारे आम्हांला नवजीवन दे. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्‍वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन १०:३४ अ. ३७-४३**

**''तो मेलेल्यातून उठल्यानंतर आम्ही त्याच्याबरोबर खाणेपिणे केले.''**

पेत्रने बोलण्यास आरंभ केला, ''योहानने बाप्तिस्म्याची घोषणा केल्यानंतर गालिलापासून प्रारंभ होऊन सर्व यहुदियामध्ये घडलेल्या गोष्टी तुम्हांला तर माहीतच आहेत. नाझरेथकर येशूला देवाने पवित्र आत्म्याचा व सामर्थ्याचा अभिषेक केला, तो सत्कर्मे करीत व सैतानाच्या सत्तेखाली असलेल्या सर्वास बरे करीत फिरला. कारण देव त्याच्याबरोबर होता आणि त्याने यहुद्यांच्या देशात व यरुशलेमात जे काही केले त्या सर्वांचे साक्षी आम्ही आहो. त्यांनी त्याला क्रूसावर टांगून मारले, पण त्याला देवाने तिसऱ्या दिवशी उठवले आणि त्याने प्रकट व्हावे असे केले. तरी हे प्रगटीकरण सर्व लोकांस नव्हे, पण देवाने अगोदरच निवडलेल्या आम्हा साक्षीदारांना केले. येशू मेलेल्यातून उठल्यानंतर आम्ही त्याच्याबरोबर खाणेपिणे केले. त्याने आम्हांस अशी आज्ञा केली की, लोकांस उपदेश करा व अशी आज्ञा द्या की, देवाने नेमलेला असा जिवंतांचा व मेलेल्यांचा न्यायधीश तो हाच आहे. त्याच्यावर विश्‍वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने पापांची क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

## प्रतिसाद स्तोत्र

**११७:१-२, १६-१७, २२-२३**

प्रतिसाद : **प्रभूचा हा दिवस आहे, ह्या दिवशी आपण उल्हास व आनंद करू या.**

१. परमेश्‍वराचे उपकारस्मरण करा
कारण तो चांगला आहा,
त्याची दया सनातन आहे.
आता इस्राएलाने म्हणावे की,
''त्यांची दया सनातन आहे.''

२. परमेश्‍वराचा उजवा हात उंचावलेला आहे,
परमेश्‍वराचा उजवा हात पराक्रम करतो.

मी मरणार नाही, मी जगेन.
आणि परमेश्वराच्या कृत्यांचे वर्णन करीन.

३. बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड
कोनशिला झाला आहे.
ही परमेश्वराची करणी आहे.
ती आमच्या दृष्टीने अद्‌भुत आहे.

## दुसरे वाचन

**पौलचे कलस्सैकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ३:१-४**

**"जेथे ख्रिस्त आहे, तेथल्या सर्व गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न करा."**

तुम्ही ख्रिस्ताबरोबर जर उठवले गेला आहा, तर ख्रिस्त देवाच्या उजवीकडे जेथे बसला आहे तेथल्या वरील गोष्टी मिळवण्याचा प्रयत्न करा. वरील गोष्टीकडे मन लावा, पृथ्वीवरील गोष्टींकडे लावू नका. कारण तुम्ही मृत झाला आहा आणि तुमचे जीवन ख्रिस्ताबरोबर देवामध्ये गुप्त ठेवलेले आहे. आपले जीवन जो ख्रिस्त तो प्रकट केला जाईल. तुम्हीही त्याच्याबरोबर गौरवात प्रकट केले जाल.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

## जयघोष

**१ करिंथ. ५:७ब-८अ**

**आलेलुया, आलेलुया!**
ख्रिस्त, आपला वल्हांडणाचा यज्ञबली
समर्पिण्यात आला आहे. म्हणून चला, आपण उत्सव करू या.
**आलेलुया!**

## शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २०:१-९**

**"त्याने मेलेल्यांतून पुन्हा उठावे हे आवश्यक होते."**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी पहाटेस अंधारातच मरिया मग्दालिया कबरेजवळ आली आणि कबरेच्या तोंडावरून धोंड काढलेली आहे असे तिने पाहिले. ह्यास्तव शिमोन पेत्र व येशूचा प्रिय शिष्य ह्यांच्याकडे धावत जाऊन ती त्यांना म्हणाली, "त्यांनी प्रभूला कबरेतून नेले व त्याला कोठे ठेवले हे आम्हांस ठाऊक नाही." ह्यावरून पेत्र व तो दुसरा शिष्य बाहेर पडून कबरेकडे जावयास निघाले. तेव्हा ते दोघे बरोबर धावत गेले आणि दुसरा शिष्य पेत्रपेक्षा लवकर धावत पुढे गेला व कबरेजवळ प्रथम पोहोचला आणि ओणवा होताच त्याला तागाची वस्त्रे पडलेली दिसली. परंतु तो आत गेला नाही. मग शिमोन पेत्रही त्याच्यामागून येऊन पोहंचला व कबरेत शिरला आणि तागाची वस्त्रे पडलेली आणि त्याच्या डोक्याला होता तो रुमाल तागाच्या वस्त्राजवळ नव्हे, तर वेगळा एकीकडे गुंडाळून पडलेला आहे असे त्याला दिसले तेव्हा जो दुसरा शिष्य पहिल्याने कबरेजवळ आला होता तोही आत गेले आणि त्याने पाहून श्रध्दा ठेवली. कारण त्याने मेलेल्यातून पुन्हा उठावे अवश्य आहे, हा शास्त्रलेख त्यांना तोपर्यंत समजला नव्हता.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, ख्रिस्तसभेला नवजन्म देण्यास व तिचे पोषण करण्यास हा बली आम्ही तुला आनंदाने अर्पण करीत आहोत. त्याचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे प्रेमळ बापा, तुझ्या ख्रिस्तसभेचा सांभाळ कर. पुनरुत्थानाच्या ह्या दिव्य संस्काराद्वारे पुनरुत्थानाचे वैभव आम्हांला दान कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## कुटुंबात करावयाच्या १२ बाबी

१. कुटुंबातील सर्वांनी दिवसाची सुरुवात 'आंजेलुस' प्रार्थनेने करणे.
२. दररोज कुटुंबात आल्तारासमोर एकत्रित येऊन प्रार्थना करणे.
३. कुटुंबातील सर्वांनी दिवसातून किमान एकवेळ एकत्रित भोजन करणे.
४. दर आठवड्याला कुटुंबातील सर्वांनी एकत्र येऊन संस्कारमय साहित्याचे वाचन व चिंतन करणे.
५. महिन्यातील एक रविवार 'कुटुंब रविवार' म्हणून साजरा करणे.
६. महिन्यातून एकदा कुटुंबातील सर्वांनी, एकत्रितपणे, सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारी भेट देणे.
७. दर महिन्याला कुटुंबाने एकत्रितपणे पवित्र स्थळी भेट देणे व प्रार्थना करणे.
८. कुटुंबातील वडीलधाऱ्या माणसांशी (आजी-आजोबा) वेळोवेळी सुसंवाद (वार्तालाप) करणे.
९. कुटुंबात पर्यावरण संवर्धन दृष्टिकोन विकसित करणे.
१०. परमेश्वराच्या दयेचा अनुभव घेण्यासाठी कुटुंबातील सर्वांनी वर्षातून दोनवेळा 'कुमसार साक्रामेंत' स्विकारणे.
११. 'राजपिठाची प्रार्थना,' रिट्रीट, स्नेहभोजन, धर्मगुरूंसोबत कौटुंबिक वार्तालाप अशा वार्षिक उपक्रमांद्वारे नातेसंबंध दृढ करणे.
१२. कुटुंबातील सर्वांनी चर्चसंलग्न संघटना किंवा गावपरिवारात सक्रिय सहभाग घेणे.

●●●

| एप्रिल २०२२ | दैनंदिन बायबल वाचने | | पहिला सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम १८ | सं गाल्डिनुस | : प्रे.कृ. २:१४,२२-३२/मत्तय २८:८-१५ | |
| मंगळ १९ | सं लिओ नववे | : प्रे.कृ. २:३६-४१/योहान २०:११-१८ | |
| बुध २० | मॉन्तेपुल्शिआनोची संत आग्नेस | : प्रे.कृ.३:१-१०/लूक २४:१३-३५ | |
| गुरु २१ | सं आन्सेल्म | : प्रे.कृ .३:११-२६/लूक २४:३५-४८ | |
| शक्र २२ | सं सौतेर | : प्रे.कृ.४:१-१२/योहान २१:१-१४ | |
| शनि २३ | संत जॉर्ज | : प्रे.कृ.४:१३-२१/मार्क १६:९-१५ | |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)